The Afternoon DESPATCH & COURIER MUMBAI | TUESDAY, DECEMBER 11, 2018

CIDCO
WE MAKE CITIES

## CITY AND INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA Ltd.

# NOTICE

### UNDER SECTION 61(1) OF THE MAHARASHTRA REGIONAL & TOWN PLANNING ACT, 1966

### NO.CIDCO/CP(NAINA)/TPS-2/2018/

WHEREAS, the Government of Maharashtra in exercise of powers conferred under clause (b) of Sub-section (1) of the Section 40 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") declared by Notification, No. TPS -1712/475/CR-98/12/UD-12: dated 10th January, 2013 and subsequent amendment (hereinafter referred to as "the said Notification") City and Industrial Development Corporation of Maharashtra Limited (being a company owned and controlled by the Government of Maharashtra) (hereinafter referred to as "the Corporation") as Special Planning Authority (hereinafter referred to as "the SPA") for Navi Mumbai Airport Influence Notified Area (NAINA) (hereinafter referred to as "said notified area") as specified therein.

And whereas, the Government of Maharashtra vide Notification No. TPS-1215/245/CR-332/2015/SM/UD-12, dated 27.04.2017 has sanctioned the Interim Development Plan for the 23 villages of NAINA under Section 31(1) of the said Act.

And whereas, the Board vide Resolution No 11973 dated 6th December, 2017 had declared its intention under Sub- Section (1) of Section 60 of the said Act, for making of Town Planning Scheme No. 2 (TPS- 2) at Village – Chipale (part), Devad(part), Bhokarpada(part), Vihighar(part), Sangade(part) and Belavali(part) of Taluka – Panvel, District Raigad for implementation of final development plan proposals.

And whereas, a notice about "declaration of intention for making TPS-2" as per provision in Section 60(2) of the said Act has been published in the Extraordinary official Maharashtra Government Gazette (part-II) dated 8th December, 2017and also in local newspapers.

And whereas, after conducting owners meet on 8th, 9th, 10th May 2018 as per rule No 4(1) of TPS Rules 1974 by calling all the land owners for discussion and after incorporating suggestions received from the owners, the draft TPS-2 was forwarded for consultation on 5th July 2018 to the Director of Town Planning, GoM, as per Section 61 (1) of the said Act and as per rule no. 4(2) of Maharashtra Town Planning Rules 1974.

And whereas, Director of Town Planning, GoM, vide letter dated 29.11.2018 forwarded the consultation in respect of draft TPS-2 for further statutory action.

And whereas, as per section 61(1) of the Act, "not later than nine months from the date of declaration, subject, however, to sub-section (3), the Planning Authority shall, publish notice in the Official Gazette within nine months (i.e. 5th September, 2018) from the date of the declaration. Also, as per section 61(3) of the Act, the State Government may, on application made by the Planning Authority or, as the case may be, the officer, by notification in the Official Gazette, extend the period specified in sub-section (1) or (2) by such period not exceeding three months as may be specified in the notification.

And whereas, the said Special Planning Authority vide letter no. 5989 dated 23/10/2018 requested Government in Urban Development Department to extend the period of three months of making and publication of the said Draft scheme under section 61(3) of the said Act, along with the resolution no.12077 dated 12/10/2018.

And whereas the Government in Urban Development Department vide Notification No. TPS-1813/3211/CR 508/ UD-13 dated 01/12/2016 has delegated power to extend the period under section 61(3) of the said Act to the Joint Director Town Planning of respective division.

And whereas, in exercise of the powers delegated to Joint Director Town Planning vide Government Notification dated 1/12/2016, the Joint Director of Town Planning, Konkan Division, Navi Mumbai vide order reference no. TPS no.2/ NAINA/ Sect 61 (3)/ Time-limit Extension/ JDTP-KDN/6509, dated 20/11/2018, extended the period of making and publication of the said Draft Scheme under sub-section (3) of the section 61 of the said Act upto and inclusive of dated 07/12/2018.

Now, therefore, in accordance with provisions of section 61(1) of the said Act, the draft Town Planning Scheme-2 has been made and is hereby published.

A copy of the draft Town Planning Scheme-2 plan along with corresponding Special Development Control Regulations are made available for inspection by the public during office hours on all working days in the office NAINA, 8th floor, Tower No 10, Belapur Railway Station Complex, CBD Belapur, Navi Mumbai 400614. The same is uploaded on website of CIDCO i.e. https://cidco.maharashtra.gov.in//naina and also can be obtained after payment of prescribed fees.

In accordance with the provisions of section 67 of the said Act, any person affected by the draft Town Planning Scheme-2 may communicate in writing any objections and /or suggestions relating to the draft scheme to the Chief Planner, NAINA, within thirty (30) days from the date of publication of this notice in the Maharashtra Government Gazette.

By the order of Board of Directors of the Corporation.
Place: - Navi Mumbai
Date: - 05/12/2018

**(V. Venu Gopal)**
**Chief Planner (NAINA)**

Regd. Office: Nirmal, 2nd floor, Nariman point, Mumbai-400021.

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

CIDCO/PR/372/2018-19

नवाकाळ मुंबई, मंगळवार ११ डिसेंबर, २०१८

सिडको
शहरांचे शिल्पकार

# शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित

# सूचना

## महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन आणि नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ६१ च्या उपकलम (१) नुसार

**क्र. सिडको / मु.नि.(नैना) / टीपीएस–२ /२०१८ /**

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन आणि नगररचना अधिनियम १९६६ (महा. अधिनियम XXXVII, १९६६ ) (येथून पुढे "उक्त अधिनियम" असे उल्लेखिलेले) च्या कलम ४० च्या उपकलम (१) मधील खंड (ब) द्वारा प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभाग (नविवि) ने अधिसूचना क्रमांक टीपीएस–१७१२/४७५/प्र.क्र.–९८/१२/नवि–१२ दिनांक १० जानेवारी, २०१३ व वेळोवेळी झालेल्या सुधारणा अन्वये त्यात नमूद केल्याप्रमाणे, नवी मुंबई विमानतळ प्रभावित.अधिसूचित क्षेत्र (नैना), (येथून पुढे उक्त क्षेत्र असे संबोधिलेले) साठी शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित (महाराष्ट्र शासनाच्या मालकीची व नियंत्रणाखालील कंपनी) म्हणजे सिडकोची "विशेष नियोजन प्राधिकरण" (येथून पुढे उक्त प्राधिकरण असे संबोधिलेले) म्हणून नेमणूक केली आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र. टीपीएस –१२१५/२४५/ सीआर –३३२/ २०१५/एस.एम./यूडी –१२, दिनांक २७ एप्रिल २०१७ नुसार नैनातील २३ गावांसाठी उक्त अधिनियमच्या कलम ३१ च्या उपकलम (१) अन्वये अंतरिम विकास आराखडा मंजूर केला आहे.

आणि ज्याअर्थी, सिडकोच्या संचालक मंडळाने दि. ०६ डिसेंबर २०१७ रोजीच्या ठराव क्र. ११९७३ अन्वये अंतिम विकास योजनेतील प्रस्तावाच्या अंमलबजावणीसाठी पनवेल तालुक्यातील रायगड जिल्ह्यातील चिपळे (भाग), देवद (भाग), भोकरपाडा (भाग), विहिघर (भाग). सांगडे (भाग) व बेलवली (भाग) येथे नगररचना परीयोजना क्रमांक –२ (नगर रचना परियोजना क्रमांक –२) करण्याकरिता अधिनियमातील कलम ६० च्या उप–कलम (१) नुसार त्याचा उद्देश घोषित केला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ६० (२) मध्ये नमूद तरतूदीनुसार नगररचना परियोजना –२ करण्याच्या उद्देशाची घोषणा दिनांक ८ डिसेंबर २०१७ रोजीच्या असाधारण अधिकृत महाराष्ट्र शासकीय राजपत्रात (भाग –२) आणि स्थानिक वृत्तपत्रे यात प्रकाशित करण्यात आलेली आहेत.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र नगररचना परियोजना नियम १९७४ च्या नियम क्र. ४(१) नुसार सर्व जमीन मालकांना दि. ८ मे, ९ मे, १० मे २०१८ रोजी चर्चेसाठी बोलवून त्यांची सभा आयोजित केल्यावर आणि जमीन मालकांकडून मिळालेल्या सूचनांचा समावेश केल्यानंतर, प्रारुप नगररचना परियोजना क्रमांक –२ चा मसुदा उक्त अधिनियमाच्या कलम ६१(१) नुसार आणि महाराष्ट्र नगररचना परियोजना नियम १९७४ च्या नियम क्रमांक ४(२) नुसार संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे विचारविनिमयासाठी दिनांक ५ जुलै २०१८ रोजी पाठविण्यात आला.

आणि ज्याअर्थी, संचालक, नगररचना, महाराष्ट्र शासन यांनी प्रारुप नगररचना परियोजना क्रमांक –२ विषयक दिनांक २१ नोव्हेंबर २०१८ अन्वये विचारविनिमय उक्त प्राधिकरणाकडे पुढील सांविधिक कार्यवाहीस्तव पाठविली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ६१(१) नुसार, ज्या योजनेंसाठी घोषणा करण्यात आली त्या क्षेत्रासाठी प्रारुप योजना तयार करुन घोषणेच्या तारखेपासून नऊ महिन्याच्या (म्हणजेच ५ सप्टेंबर, २०१८) आत उक्त प्राधिकरणाने संचालक, नगररचना, यांच्याशी विचारविनिमय करुन, अधिकृत महाराष्ट्र शासकीय राजपत्रात सूचना प्रकाशित करावयाची असते. तरीही उक्त अधिनियमाच्या कलम ६१(३) नुसार नियोजन प्राधिकरणाने किंवा यथास्थिती, त्या अधिकाऱ्याने राज्य शासनास अर्ज केल्यानंतर, उक्त अधिनियमाच्या पोटकलम (१) किंवा (२) अनुसार राजपत्रातील अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात आलेला कालावधी ३ महिन्यांहून अधिक नसेल अशा मुदतीने वाढविता येतो.

आणि ज्याअर्थी, उक्त प्राधिकरणाने दिनांक १२ऑक्टोबर२०१८ च्या ठराव क्रमांक १२०७७ अन्वये उक्त प्रारुप नगररचना परियोजनेचा मसुदा तयार करुन प्रसिध्द करण्यासाठी तीन महिन्यांची मुदतवाढ मिळण्याबाबतच्या प्रस्तावास मंजुरी दिली असून, त्या अनुषंगाने उक्त प्राधिकरणाच्या दिनांक २३ ऑक्टोबर २०१८च्या पत्र क्रमांक ५९८९ अन्वये मुदतवाढ मिळणेबाबत शासनास विनंती केली आहे.

आणि ज्या अर्थी शासनाने नगरविकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टीपीएस–१८१३/३२११/प्र.क्र.५०८/नवि–१३, दिनांक १ डिसेंबर २०१६ अन्वये, उक्त अधिनियमाच्या कलम ६१(३) अन्वये मुदत वाढ देण्याचे अधिकार संबंधित विभागीय सहसंचालक, नगर रचना यांच्या प्रत्यार्पित केलेले आहेत.

ज्या अर्थी, शासन अधिसूचना नगरविकास विभाग क्रमांक टीपीएस–१८१३/३२११/प्र.क्र.५०८/नवि–१३, दिनांक १डिसेंबर २०१६ अन्वये, प्रदत्त केलेल्या शक्तीचा वापर करुन सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, नवी मुंबई आदेश क्र.प्रा.न.र.यो.क्र. २/नैना/कलम ६१(३)/मुदतवाढ/सहकोवि/६५०९ दिनांक २० नोव्हेंबर २०१८ अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम ६० पोटकलम (३) नुसार उक्त प्रारुप नगर रचना परियोजनेचा मसुदा तयार करुन प्रसिध्द करण्याकरीता दिनांक ०७ डिसेंबर २०१८ हा दिवस धरुन त्या दिवसापर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

आता, म्हणून उक्त अधिनियमातील कलम ६१(१) च्या तरतुदींनुसार, याद्वारे प्रारूप नगररचना परीयोजना क्रमांक– २ तयार करण्यात आली आहे असे जाहीर केले जाते आहे आणि ती याद्वारे प्रकाशित करण्यात येत आहे.

प्रारूप नगररचना परीयोजना क्रमांक –२ योजनेची प्रत संबंधित विशेष नियंत्रण नियमावलीसह नैना कार्यालय, ८ वा मजला, टॉवर नं. १०, बेलापूर रेल्वे स्टेशन संकुल, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ येथे कार्यालयीन कामकाजाच्या सर्व दिवशी नागरिकांच्या अवलोकनार्थ खुली ठेवण्यात आली आहे. तसेच प्रारूप नगररचना परीयोजना क्रमांक –२ सिडकोचे संकेतस्थळ https://cidco.maharashtra.gov.in//naina येथेसुद्धा अपलोड केली गेली आहे आणि विहित शुल्क भरल्यानंतर देखील मिळू शकते.

उक्त अधिनियमाच्या कलम ६७ च्या तरतुदींनुसार, प्रारूप नगररचना परीयोजना क्रमांक –२ ने बाधित होत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने प्रारूप योजनेशी संबंधित कोणतेही आक्षेप आणि / किंवा सूचना ही नोटीस महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत मुख्य नियोजनकार, नैना यांच्याकडे सादर करावे.

महामंडळाच्या संचालक मंडळाच्या आदेशानुसार
स्थळ: नवी मुंबई
दिनांक: ०५/१२/२०१८

व्ही. वेणू गोपाल
मुख्य नियोजनकार (नैना)

नोंदणीकृत कार्यालय: निर्मल, २ रा मजला, नरीमन पॉईंट, मुंबई ४०००२१

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/३७२/२०१८-१९